अल्झायमरचे निदान दहा वर्षांआधी शक्य

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : अल्झायमर आजार होण्याच्या दहा वर्षे आधीच त्याची लक्षणं रक्त तपासणीतून दिसू शकतात, असा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी काढला आहे. या आजारात मेंदूतील टॅऊ प्रथिनांमधील बदलांमुळे स्मरणशक्ती कमी होत जाते. त्याच टॅऊ प्रथिनांचे वाढते प्रमाण रक्त तपासणीतून शोधता येऊ शकते, असे आता स्पष्ट झाले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सॅनफ्रान्सिस्को येथील शास्त्रज्ञांचा समावेश असलेल्या पथकाने याबर संशोधन केले असून त्यासंदर्भातील शोधनिबंध लॅन्सेट जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. मेंदूतील अ‍ॅमिलॉईड बिटा आणि फॉस्फोरीलेटेड टॅऊ प्रथिनांचा बेबंद प्रसार हे अल्झायमरचे प्राथमिक लक्षण असते. नियमित रक्त तपासणीतून या दोन्ही घटकांच्या प्रमाणावर निरीक्षण ठेवणे शक्य झाले आहे. शास्त्रज्ञांनी यासाठी अमेरिकेतील १३५० सरासरी ६१ वर्षे वयोगटातील सुदृढ लोकांच्या रक्ताचे नमुने घेतले. त्यातील अल्झायमरशी संबंधित प्रथिनांचे प्रमाण जास्त असलेल्यांची संख्या सहा टक्के अर्थात ८६ एवढी नोंदवण्यात आली. या ८६ जणांमध्ये स्मरणशक्तीशी संबंधित प्रश्न वाढत असल्याचेही स्पष्ट झाले. यामध्ये स्मरणशक्ती, एकाग्रता कमी होणे, नवीन आव्हान स्वीकारण्यात अडचणी येणे, तसेच शब्दांबाबतचा विसरभोळेपणा अशी लक्षणं प्रामुख्याने आढळून आली. श्रवणशक्ती क्षीण होणे, निद्रानाश, शारीरिक हालचाली कमी होणे हीदेखील अल्झायमरची प्राथमिक लक्षणं असू शकतात, असे शास्त्रज्ञांनी नमूद केले आहे.

हेअरफॉल आणि इतर हेअर प्रॉब्लेम्सवर
FREE हेल्थ चेकअप
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन. आजच नाव नोंदवा
डॉ. रुवाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर
ठाणे क्लिनिक
क्लिनिकची वेळ : सकाळी 10 ते रात्री 8
9082911530
Dr. Rudra's Tanvi Herbals Clinic

एचडीएफसी बँकेच्या सीईओंवरील गुन्हा रद्द करण्याचा निर्णय कायम

मुंबई : एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) शशीधर जगदीशन यांच्यावरील लाचखोरीचा गुन्हा रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाने ५ मे रोजी दिलेल्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात हस्तक्षेप करण्यास शुक्रवारी तूर्त नकार दिला. त्याचवेळी, अपिलाची दखल घेऊन जगदीशन यांच्यासह अन्य प्रतिवादींना नोटीस बजावली.

जगदीशन यांनी लीलावती कीर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टच्या काही माजी विश्वस्तांशी संगनमत केले, तसेच, ट्रस्टच्या निधीतून सुमारे दोन कोटी रुपयांची बेकायदा देयके कथितरित्या स्वीकारल्याप्रकरणी ट्रस्टने केलेल्या तक्रारीच्या आधारे जगदीशन यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. तथापि, हा गुन्हा म्हणजे बँकेने सुरू केलेल्या ६५ कोटींच्या थकबाकी वसुली प्रक्रियेला दिलेले केवळ एक प्रत्युत्तर असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने तो रद्द केला होता. ट्रस्टने या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

'एफडीए'ची औषध विक्रेत्यांवर कारवाई

मुंबई : दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि अवैध औषध उत्पादनाद्वारे जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यक्ती आणि आस्थापनेविरोधात अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देत अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ७ जिल्ह्यांत कारवाई करून ७३ लाख २४ हजार ६५६ रुपये किमतीचा साठा जप्त केला.

यामध्ये उत्तराखंड-हरिद्वार येथील मे. दिव्या फार्मसीच्या उत्पादनांवर कारवाई करण्यात आली. यात नागपूर येथून ७ लाख २६ हजार रुपयांचा, नाशिकमधून ७ लाख १० हजार, पुणे येथून १४ लाख ६८ हजार, मुंबईतून १ लाख ८५ हजार, कोकण विभागातून १८ लाख ५८ हजार, अमरावतीमधून १ लाख ४२ हजार २२९ रुपये, छत्रपती संभाजीनगरमधून ४८ हजार ७१८ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

फसव्या जाहिरातीबाबत तक्रार करण्याचे आवाहन

अवैध औषध विक्री, औषधांमधील भेसळ किंवा फसव्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी नागरिकांनी अशा उत्पादनाबाबत प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी. तक्रार करताना आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक तसेच संशयित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि औषधाचे नाव स्पष्टपणे नमूद करावे.

१४ हजार कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे समायोजन रखडले

शासनाला मंत्रिमंडळ निर्णयाचाच विसर | 'एनएचएम'मधील कर्मचाऱ्यांमध्ये संताप

महेश बोकडे, लोकसत्ता

नागपूर : राष्ट्रीय आरोग्य अभियानात १० वर्षांहून अधिक सेवा बजावणाऱ्या १४ हजार कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा निर्णय शासनाने घेतला, त्याला मंत्रिमंडळाची मंजुरीही मिळाली. आरोग्यमंत्र्यांसोबत अनेक बैठका झाल्या; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही. त्यामुळे राज्यभरातील हजारो अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप असून शासनाच्या आश्वासनांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यात गेल्या २० वर्षांपासून ग्रामीण आणि शहरी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी आरोग्य सेविका, सहायिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आदी संवर्गातील कर्मचारी अत्यल्प मानधनावर सेवा देत आहेत. करोना महामारीच्या काळातही त्यांनी आरोग्य सेवा दिली. मात्र, त्यांच्या समायोजनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे. या सर्वांच्याच समायोजनासंदर्भात २० मार्च २०२३ रोजी सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांच्या दालनात बैठक झाली होती. त्यानंतर समायोजनाचा निर्णय घेण्यात आला आणि मंत्रिमंडळाने त्याला मंजुरी दिली. पुढे अनेक बैठका पार पडल्या. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आरोग्यमंत्र्यांनी १५ जानेवारी २०२६ पर्यंत समायोजनासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

> वर्षानुवर्षे अत्यल्प वेतनावर काम करताना करोना काळातही एनएचएममधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. शासनाने त्यांना कायम करण्याचा निर्णय घेतला. मात्र, निर्णयाची अंमलबजावणी न करता कर्मचाऱ्यांची थट्टा केली जात आहे. शासनाने तातडीने समायोजन करून सगळ्यांना न्याय द्यायला हवा. अन्यथा आंदोलन केले जाईल.
>
> **- डॉ. अरुण कोळी,** मार्गदर्शक, राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी-कर्मचारी समायोजन कृती समिती, महाराष्ट्र राज्य

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ३१ मार्च २०२४ पर्यंत १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी परिचारिका, शहरी व ग्रामीण आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची घोषणा शासनाने केली होती. त्यावेळी सुमारे १४ हजार अधिकारी व कर्मचारी समायोजनासाठी पात्र होते. मात्र, त्यापैकी केवळ चतुर्थश्रेणीतील सुमारे ५०० कर्मचाऱ्यांचेच समायोजन करण्यात आले. त्यानंतर शासनाकडून वारंवार आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्ष निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजी वाढत आहे.

दरम्यान, कालावधी लोटत असल्याने आता आणखी अनेक कर्मचाऱ्यांनी १० वर्षांची सेवा पूर्ण केली असून समायोजनाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याशी भ्रमणध्वनी आणि लघुसंदेशाद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

मा. ऋण वसूली न्यायाधिकरण नागपूर

'बी' ब्लॉक दुसरा माळा, सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर - ४४०००६

ओ.ए. क्रमांक ४५२/२०२० F.P. २४/०९/२०२५

इंडियन बँक (एस्टवाईल अलाहाबाद बँक), अमरावती मेन ब्रा., अमरावती
-विरुद्ध-
मेसर्स महालक्ष्मी ट्रेडर्स आणि ३ इतर

प्रतिवादी:
१) मे. महालक्ष्मी ट्रेडर्स (प्रतिनिधी द्वारा)
प्लॉट नं. 151, टाउनशिप पोटे इस्टेट, कठोरा रोड कठोरा, अमरावती
त्याच्या भागधारकाद्वारे.
2) श्री. मंगेश S/o. गंगाधरराव उखळे (मालक - M/s. महालक्ष्मी ट्रेडर्स) मेजर वयात पूर्ण. Occu.: व्यवसाय
प्लॉट नं. 151, टाउनशिप पोटे इस्टेट, कठोरा रोड कठोरा, अमरावती.
०४) श्री. रोहन S/o. आनंद भोयर मेजर वयात पूर्ण, Occu.: व्यवसाय
वॉर्ड क्रमांक १, रविविराज कॉलनी न्यू रविनगर नगर, अमरावती ४४४६०५

वर्तमानपत्र प्रकाशनाद्वारे सूचना

१. ज्याअर्थी उपरोक्त नामांकित अर्जदार / अपीलकर्त्यांनी या न्यायाधिकरणात वरील संबंधित अर्ज / अपील दाखल केला आहे.

२. ज्याअर्थी समन्स / सूचनेची सेवा सामान्य पद्धतीने लागू करता आली नाही आणि ज्याअर्थी अर्ज प्रतिस्थापित सेवेसाठी या न्यायाधिकरणाने परवानगी दिली आहे.

३. तुम्हाला व्यक्तीशः किंवा तुमच्या वकिलामार्फत दि.२४/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायाधिकरणासमोर हजर राहून प्रार्थना केलेल्या सवलती का देऊ नयेत याचे कारण लेखी स्वरूपात दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

४. हे लक्षात घ्या की, जर यात चूक झाल्यास, अर्ज / अपीलवर तुमच्या अनुपस्थितीत सुनावणी केली जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

दिनांक २८/०८/२०२४ रोजी नागपूर येथे माझ्या सहीनिशी न्यायाधिकरणाचा शिक्का दिला आहे.

शिक्का
रजिस्ट्रार
ऋण वसूली न्यायाधिकरण, नागपूर

मा. ऋण वसूली न्यायाधिकरण नागपूर

"बी" ब्लॉक दुसरा माळा, सी जी ओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर-४४००६

ओ.ए. : ३३४/२०२४ एफ.एफ. ०८/०७/२०२६

इंडियन बँक-विरुद्ध-श्री प्रदीप जयकिशन दमानी

ते,
प्रतिवादी
प्रति. - १) श्री प्रदीप ऐसओ जयकिशन दमानी,
४०६, हिमालय रेखा, ५, शिवाजी नगर, नागपूर- ४४००१० तसेच मु. ६४, श्री गोविंद अपार्टमेंट, हिल टॉप ले आउट, राम नगर चौकाजवळ, नागपूर - ४४००१०
प्रति. - २) श्रीमती जयश्री प्रदीप दमानी,
४०६, हिमालय रेखा, ५, शिवाजी नगर, नागपूर- ४४००१०, तसेच मु. ६४, श्री गोविंद अपार्टमेंट, हिल टॉप ले आउट, राम नगर चौकाजवळ, नागपूर - ४४००१०

वर्तमान पत्र प्रकाशना द्वारे सूचना

०१) कारण वरील नावाच्या अर्जदाराने / अपीलकर्त्याने या न्यायाधिकरणात वर उल्लेख केलेला अर्ज / अपील दाखल केला आहे.

०२) कारण समन्स / नोटीसची बजावणी सामान्य पद्धतीने करता आली नाही आणि या न्यायाधिकरणाने बदली सेवेसाठी अर्ज मंजूर केला आहे.

०३) तुम्हाला या न्यायाधिकरणासमोर व्यक्तिशः किंवा वकिलामार्फत हजर राहण्याचे आणि ०८/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता लेखी निवेदन / उत्तर दाखल करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

०४) लक्षात घ्या की जर काही चूक झाली तर, अर्ज / अपील तुमच्या अनुपस्थितीत ऐकले जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

दि. १३/०५/२०२६ रोजी नागपूर येथे माझ्या सही निशी न्यायाधिकरणाचा शिक्का दिला आहे.

मुहर
सही/-
रजिस्ट्रार
ऋण वसूली न्यायाधिकरण, नागपूर

हिंदुजा हाउसिंग फायनान्स लिमिटेड

HINDUJA HOUSING FINANCE
मुख्य कार्यालय : 167-169, [illegible] ईमेल आयडी : auction@hindujahousingfinance.com

शाखा पत्ता : पहिला मजला, श्रीजी कॉम्प्लेक्स, वर्धा रोड, एसबीआय चौक जवळ, यवतमाळ, जि. यवतमाळ - ४४५००१. गांधी नगर, साकुरे हॉस्पिटल जवळ, आर्वी रोड, वर्धा - ४४२००१.

अनु 13(2) अंतर्गत मागणी सूचना

आपण, म्हणजे खाली नमूद कर्जदारांनी खाली नमूद मालमत्ता तारण ठेवून कर्ज घेतलेले आहे आणि आपण, म्हणजे खाली नमूद व्यक्ती सदर कर्ज करारासाठी कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार आहात. आपण परतफेडीत कसूर केल्याने आपले खाते सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (थोडक्यात सर्फेसी अधिनियम) अंतर्गत अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आले आहे. आम्ही, म्हणजे हिंदुजा हाउसिंग फायनान्स लिमिटेड ने आपल्या दिलेल्या पत्त्यावर सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 (3) सह वाचण्यात येणाऱ्या अनु. 13 (2) अंतर्गत मागणी सूचना पाठविली. नोंदणीकृत टपाल / कुरियरद्वारे आपल्याला पाठवलेल्या सूचना बजावण्यात आणि त्या तशाच परत आल्या. सदर सूचनेत असे नमूद करण्यात आले आहे की आपण ज्या कर्जाच्या परतफेडीची हमी दिलेली होती त्याच्या परतफेडीत कसूर केलेली आहे. त्यामुळे, सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 (2) मधील तरतुदी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) च्या तरतुदींच्या अनुषंगाने ही सूचना प्रकाशित करण्यात येत आहे.

कर्जदार व जामीनदाराचे नाव / खाते क्र.	मागणी सूचनेनुसार थकबाकी रक्कम	मागणी / एनपीए दिनांक
१. श्री मनोज जयस्वाल (कर्जदार), २. श्री नंदकिशोर जयस्वाल (सह-कर्जदार) आणि ३. कु. शोभा जयस्वाल (सह-कर्जदार) MH/YAV/YAVA/A000000133	07/05/2026 रोजी रु. 986289.00/-	15/05/2026 06-05-2026
जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग फ्लॅट नं. ए-3 (तळ मजला) गजसिधु अपार्टमेंट बिल्ट अप एरिया 37.16 चौ.मी., सोबतच 17.32 चौ.मी. अविभाजित जमिनीचा वाटा लेआउट प्लॉट नं. 32, संपूर्ण क्षेत्रफळ (294.50 चौ.मी), फिल्ड सर्वे नं. 17 / 1, मौजे वाघापूर ता आणि जि. यवतमाळ, रा. वाघापूर येथे स्थित, यवतमाळ, उप नोंदणी जिल्हा यवतमाळ आणि नगरपरिषद यवतमाळ च्या हद्दीत, आणि चतुःसीमा - उत्तर प्लॉट नं 32 चा भाग, दक्षिण प्लॉट नं. 4, पूर्व प्लॉट नं. 32 चा भाग, पश्चिम प्लॉट नं. 2		
१. श्री योगेश फटिंग (कर्जदार), २. श्री नारायण फटिंग (सह-कर्जदार), ३. श्री सर्व फटिंग (सह-कर्जदार) आणि ४. कु. अंचल फटिंग MH/NGR/WARD/A000000046	07/05/2026 रोजी रु. 585227.00/-	15/05/2026 06-05-2026
संकलीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग प्लॉट नं. 47 संपूर्ण क्षेत्रफळ (2410.00 चौ फूट) (224.00 चौ.मी) पी.एच नं. 21, खा.नं. 67 / 1, मौजा नं. 72, ता. देवळी, जि. वर्धा आणि संपत्ती चतुःसीमा - उत्तर 9 मी लेआउट रोड, दक्षिण श्री. देवमने यांचा प्लॉट, पूर्व 9 मी लेआउट रोड, पश्चिम [illegible] यांचा प्लॉट		

1)नितेश चव्हाई (RLM)-9011858221 2)[illegible] (ALM)-9823244496
3)[illegible] (CLM)-9405473296 4)[illegible] (CRM)-8225000399

स्थळ : यवतमाळ
दिनांक : 30.05.2026

हिंदुजा हाउसिंग फायनान्स लिमिटेड,
प्राधिकृत अधिकारी

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित

महाप्रित
(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

महाप्रित कंपनीकडे विविध पदांकरीता करारतत्वावर नियुक्तीसाठी सूचना

महाप्रित कंपनीमध्ये खालील पदांवर करारतत्वावर १ वर्षाच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे :

अ.क्र.	पदनाम	एकूण पदे
१	मुख्य महाव्यवस्थापक (Housing & Encroachment)	०१
२	मुख्य महाव्यवस्थापक (SRA Projects)	०१
३	मुख्य महाव्यवस्थापक (Water Supply)	०१

तरी इच्छुक उमेदवारांनी https://forms.gle/gDpaDNCadLdbXvoU9 या लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.१५/०६/२०२६ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. ऑनलाईन अर्ज सादर करण्यास तांत्रिक अडचण असल्यास dgm.admin@mahapreit.in या ई-मेलवर अर्ज सादर करावेत अथवा कंपनीच्या पत्त्यावर विहित मुदतीपूर्वी पोहचतील या बेताने पाठवावेत. अधिक माहितीकरिता कृपया https://mahapreit.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

कार्यकारी संचालक (प्रशासन)
महाप्रित

सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

Sitaara
[illegible]

मागणी सूचना

[illegible]

अ.क्र.	कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदाराचे नाव	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम
१	कर्ज खाते क्र. [illegible], [illegible]	दि. 18.05.2026 रु. 7,63,362.79/- दि. 13.05.2026 [illegible]
२	कर्ज खाते क्र. [illegible], [illegible]	दि. 18.05.2026 रु. [illegible] दि. 13.05.2026 [illegible]
३	कर्ज खाते क्र. [illegible], [illegible]	दि. 18.05.2026 रु. 4,86,404.49/- दि. 13.05.2026 [illegible]
४	[illegible]	दि. 22.05.2026 [illegible]
५	[illegible]	दि. 20.05.2026 [illegible]
६	[illegible]	दि. 18.05.2026 [illegible]
७	[illegible]	दि. 20.05.2026 [illegible]
८	[illegible]	दि. 20.05.2026 [illegible]

[illegible]

ठिकाण : [illegible], दिनांक : 30-05-2026

प्राधिकृत अधिकारी, सितारा हाऊसिंग फायनान्स लि.

पंजाब नॅशनल बँक punjab national bank

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.२ व ३ [illegible], नाशिक - 422005, फोन : 0253- 2323030, ईमेल cs[illegible]@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

[illegible]

लॉट क्र.	[illegible] कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	[illegible]	[illegible]	लिलावाचे दिनांक व वेळ	[illegible]
१	[illegible]	[illegible] PUNB[illegible]	[illegible]	[illegible]	दि. १६.०६.२०२६ [illegible] ११.०० ते दुपारी ४.०० [illegible]	[illegible]

[illegible]

3. [illegible] https://baanknet.com [illegible]

5. [illegible] www.pnb.bank.in आणि https://baanknet.com [illegible]

दिनांक - ३०.०५.२०२६
स्थळ - नाशिक

सही/-
[illegible]
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

Bank of Maharashtra

बँक ऑफ महाराष्ट्र
अंचल कार्यालय अकोला 444005 Zonal office- Akola 444005
[illegible] TELE: 0724-2490842,843,845, 0724-2490353 ई-मेल/e-mail - dmakola@mahabank.co.in
प्रधान कार्यालय: लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5, Head Office: LOKMANGAL,1501,SHIVAJINAGAR,PUNE-5

AK19/5521/SARFAESI/2026-27/E AUCTION
दिनांक : 29/05/2026

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना (परिशिष्ट - IV-A)

[illegible] 2002 [illegible] ई-लिलाव विक्री सूचना, [illegible] 2002, च्या नियम 8(6) / 9(1) [illegible]

सर्व साधारणपणे आणि खासकरून खालील नमूद कर्जदार व जमानतदार यांना सूचित करण्यात येत आहे की, बँक ऑफ महाराष्ट्रकडे [illegible] आधारावर दि. 16/06/2026 रोजी विकल्या जाईल. [illegible]

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	जमानतदाराचे नाव	देय रक्कम	ज्ञात बोजा असलेल्या स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन	राखीव किंमत / बयाणा रक्कम
1.	शाखा : एम.जि.रोड (34) संपर्क: 91 9766832184 brmgr34@bankofmaharashtra.bank.in मेसर्स लक्ष्मी टायर्स (कर्जदार) व्यवसायिक पत्ता: प्लॉट नं. 12ए, 12बी आणि 13, सर्वे नं. 88 / 1, लक्ष्मी टायर्स, मौजे [illegible], [illegible] ग्रामपंचायत, रा. न्यु नॅशनल कॉलनी, गुलजार रहिवासी कॉम्प्लेक्स, अकोला नाका रा. अकोला- बालापुर रोड, बालापुर,ता. बालापुर जि. अकोला	पार्टनर्स आणि जमानतदार श्री. [illegible] रहिवासी पत्ता: शिव मंदिर लाईन, सिंधी कॅम्प, कच्ची खोली अकोला- 444001, श्री. [illegible] रहिवासी पत्ता: शिव मंदिर लाईन, सिंधी कॅम्प, कच्ची खोली अकोला- 444001, जमानतदार श्री. [illegible] रहिवासी पत्ता: सिंधी कॅम्प, कच्ची खोली अकोला- 444001 पत्ता-2- [illegible]	रु. 89,84,389.00 ([illegible]) तसेच लागू असलेला [illegible] व इतर शुल्क [illegible] 25/05/2026	मालमत्ता 1: गहाण असलेला सर्व भाग आणि तुकडा जमीन सोबतच आणि स्ट्रक्चर / रहिवासी ब्लॉक / बांधकाम लेआउट प्लॉट नं. 12-ए, 12-बी आणि 13, जोडलेले क्षेत्रफळ एरिया- 499.00 (चौ.मी) सर्वे नं. 88 / 1, "मेसर्स लक्ष्मी टायर्स" ([illegible]) मौजे [illegible], [illegible] ग्रामपंचायत, रा. न्यु नॅशनल कॉलनी, गुलजार [illegible] कॉम्प्लेक्स, अकोला नाका रा. अकोला- बालापुर रोड, बालापुर, ता. बालापुर जि. अकोला मालमत्ता 2: गहाण असलेला सर्व भाग आणि तुकडा जमीन सोबतच आणि स्ट्रक्चर / रहिवासी ब्लॉक / बांधकाम लेआउट प्लॉट नं. 29, सर्वे नं. 220, मौजे / कसबे शेगाव भाग-1, श्री गजानन महाराज [illegible], रा. [illegible] शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा, क्षेत्रफळ एरिया (प्लॉट) 187.00 (चौ.मी)	मालमत्ता नं. 1: राखीव रक्कम रु. 1,91,00,000.00 (रुपये एक कोटी एक्याण्णव लाख फक्त) बयाणा रक्कम रु. 19,10,000.00 (रुपये एकोणीस लाख दहा हजार फक्त) मालमत्ता नं. 2: राखीव रक्कम रु. 13,00,000.00 (रुपये तेरा लाख फक्त) बयाणा रक्कम रु. 1,30,000.00 (रुपये एक लाख तीस हजार फक्त)

टीप: वर उल्लेख केलेल्या मालमत्तेसाठी बँकेच्या रेकॉर्डनुसार कोणताही ज्ञात बोजा नाही. इच्छुक बोलीदार त्याबद्दल स्वतःहून चौकशी करू शकतात.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया बँकेच्या वेबसाइटवर आणि PSB Alliance Baanknet पोर्टल https://baanknet.com/eauction-psb/home वर दिलेल्या लिंक https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search पहा. [illegible] सांकेतिक ताबा. बोली वाढ रक्कम रु. 25,000/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ई-लिलावाची तारीख आणि वेळ 16/06/2026 सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यंत. मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ 11/06/2026 सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत पूर्व अपॉइंटमेंटसह. देय तपशील :- [illegible] 25% (पंचवीस टक्के) रक्कम [illegible] (15) दिवसांच्या आत जमा करावी लागेल.

1) [illegible] "ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडिंग" प्रक्रिया असेल. (2) ही प्रकाशन सूचना वरील नमूद कर्जाच्या खात्याचे कर्जदार / जामीनदार / गहाणदार [illegible] (15) [illegible] सूचना. (3) अधिक माहितीसाठी कृपया मो.क्र 0724-2490842,843,845; ईमेल : recoveryako@bankofmaharashtra.bank.in legal_ako@bankofmaharashtra.bank.in / dzmakola@bankofmaharashtra.bank.in वर संपर्क साधावा. (4) ही सूचना स्थानिक भाषेतही प्रकाशित केली जात आहे. अर्थ लावण्याचा कोणताही प्रश्न उद्भवल्यास इंग्रजी आवृत्ती अंतिम असेल.

दिनांक : 29 / 05 / 2026, स्थान : अकोला
(टिप: अचूक माहिती करिता इंग्रजी नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.)
(अनिल कुजुर) अधिकृत अधिकारी